
Students' Bulletin, University of Pune

# Chetana
# चेतना



Editor in Chief : Dr. Arun Adsool, Actg. Vice Chancellor

Publisher : Dr. Manik Jadhav, Registrar

Editor : Dr. Sambhaji Pathare, Director, Board of Students' Welfare

Issue 4 : August 2009 :
Diamond Jubilee Year

## Inside

Page No.

3 Past Events

4 Current Affairs


5 University Campus


7 Extra-Curricular

8 Announcements & Highlights

9 College Activities

12 Upcomings









## SWINE FLU :

### Symptoms and Treatment

- The basic symptoms for swine flu are similar to the seasonal flu-fever, sore throat, cough, stuffy nose, headache, body aches and fatigue.
- $H_1N_1$ strain is a mutated form of the swine virus. It is communicable only through human-to-human contact.
- Tamiflu, Relenza are prescription drugs effective against these strains of swine flu.
- There is no vaccine for swine flu as yet.
- The incubation period is one to seven days.
- If an antiviral agent is warranted, it should ideally be initiated with 48 hours from the onset of symptoms.

### Precautions

Here are a few simple do's and don'ts that will help to prevent spreading the infection :

- Maintain hygiene, wash hands frequently.
- Avoid contact with those who cough and sneeze.
- Avoid crowded places and social gatherings.
- If there are any symptoms, contact the doctor immediately as the treatment drugs are not available in the open market.
- If infected, stay home and avoid travelling.
- Always cover mouth while coughing or sneezing, to avoid the disease from spreading.



## संपादकीय

'चेतना'चे मुख्य कार्यकारी संपादक व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांची नुकतीच आपल्या देशाच्या नियोजन मंडळाच्या 'सदस्य'पदी नियुक्ती झाली. या पदावर ते १६ जून, २००९ रोजी रुजू झाले. त्यांच्या कुलगुरुपदाच्या तीन वर्षांच्या झंझावाती कारकिर्दीत त्यांनी अनेक निर्णय घेतले, त्यांपैकी 'चेतना' या विद्यार्थी वार्ता अंकाचे प्रकाशन हा एक महत्त्वपूर्ण निर्णय होय. विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असलेली सर्व प्रकारची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक प्रभावी माध्यम असले पाहिजे अशी संकल्पना त्यांनी मांडली. व त्यातूनच 'चेतना' हे त्रैमासिक अस्तित्वात आले. सदर मंडळाने आपणां सर्वांना सहकार्याचे आवाहन केले व आपणही ते सातत्याने करत आहात. 'चेतना' प्रकाशनाच्या वर्षपूर्तीनंतर हा चौथा अंक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. विद्यमान प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ जे या अंकाच्या प्रकाशनामध्ये सुरुवातीपासून सक्रिय सहभागी होते, त्यांनी 'चेतना'च्या मुख्य कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी स्वीकारल्याने अंकाच्या प्रकाशनातील सातत्य निश्चितच कायम राहील. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच हा चौथा अंक प्रकाशित झाला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा मुकाबला करत 'कमवा व शिका' योजनेतून आपले उच्चशिक्षण संपादन करून 'सुवर्णपदक' पटकावलेले डॉ. अरुण अडसूळ यांच्यामध्ये विद्यार्थ्यांविषयी प्रचंड तळमळ दिसून येते. विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या प्रश्नांशी त्यांचे सहृदय नाते असल्याने त्याचा प्रभाव चेतनाच्या अंतरंगात आपणांस निश्चितपणे दिसेल. या अंकात 'स्वाइन फ्लू'शी सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांनी केलेले आवाहन हे त्याचेच प्रतीक म्हणता येईल.

विद्यापीठातील 'रोजगार व स्वयंरोजगार' विभागाकडून नोकरीविषयक माहिती विद्यार्थ्यांसाठी प्रथमच देण्यात येत आहे. 'चेतना' अजूनही बाल्यावस्थेत आहे. त्यामुळे सुधारणांना खूप वाव आहे, समितीने सुचविलेल्या सदरांखाली आम्ही माहिती देत आहोत. तथापि, अंकाविषयी काही बदल, सूचना, अथवा प्रतिक्रिया असल्यास जरूर कळवा; त्यांचा लाभ सर्वांनाच होईल.

या अंकाच्या निर्मितीसाठी ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्व विभागप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यापीठातील अधिकारी, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व विद्यार्थी कल्याण मंडळाचे सेवक यांना धन्यवाद दिलेच पाहिजेत. प्रा. गणेश राऊत व प्रूफ–रीडर श्री. म. द. पाठक यांचे 'चेतना' प्रकाशनाच्या सहकार्यातील सातत्य वाखाणण्याजोगे आहे. विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त सर्व वाचकांना शुभेच्छा !

**डॉ. संभाजी पठारे**
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ.



## प्रभारी कुलगुरू यांचे युवकांना आवाहन

विद्यार्थी मित्रहो,

आपला भारत देश 'स्वाइन फ्लू'च्या अभूतपूर्व समस्येला सामोरा जात आहे. विविध राज्यांमध्ये कमी–अधिक तीव्रता असलेल्या 'स्वाइन फ्लू'चा पुणे शहर व परिसरावर अधिक प्रभाव असल्याचे आपणास ज्ञात आहे. याचा सामना करण्यासाठी शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्था अहोरात्र निकराची झुंज देऊन बाधित व्यक्तींचे प्राण वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. तरीही या अनपेक्षित संसर्गजन्य आजारामुळे अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले. यांमध्ये निष्पाप व्यक्ती, शाळकरी मुलेही दगावल्याची वेदना अत्यंत असह्य करणारी आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करताना प्रशासनाने पुणे शहर, पिंपरी–चिंचवड परिसरातील सर्व शाळा, महाविद्यालये आठवडाभर बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. तथापि 'स्वाइन फ्लू' चा मुकाबला करण्यासाठी प्रयत्न अपुरे पडत आहेत. आपणही विद्यापीठाच्या स्तरावरून या अनपेक्षित आजाराने भयभीत झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यासाठी विधी विभाग, जयकर ग्रंथालय, इत्यादी ठिकाणी सभा घेतल्या. विद्यार्थी कल्याण मंडळाने भित्तिपत्रके छापून सर्व महाविद्यालयांमध्ये लावली, आरोग्य केंद्राने संकेतस्थळावरून सूचनाही दिल्या. परंतु, समाजात अजूनही भितीचे वातावरण दिसत आहे. अफवा व गैरसमजांतून नागरिक भयभीत होत आहेत. अशा वेळी आपण सर्व युवा–युवतींनी 'स्वाइन फ्लू'ची शास्त्रोक्त माहिती घेऊन स्वत:ची काळजी घेत असतानाच आपल्या घरातल्या, गल्लीतल्या व भागातल्या नागरिकांचे याबाबत प्रबोधन करावे. 'आरोग्यदूत' या भूमिकेतून या प्रसंगी नागरिकांनी काय करावे व काय टाळावे यांबाबतचे प्रबोधन करावे. युवा–युवती हे चैतन्याचे स्रोत असतात. या स्रोतांनी मनांवर घेतल्यास ते चमत्कार घडवू शकतात यावर माझा विश्वास असल्याने पुणे विद्यापीठाच्या सर्व युवा–युवतींना सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून हे नम्र आवाहन.

**डॉ. अरुण अडसूळ**
प्रभारी कुलगुरू,

## समर्थ भारत अभियानात सर्व घटकांनी सामील होण्याची गरज :

पुणे विद्यापीठाच्या समर्थ भारत अभियान वर्धापन दिनानिमित्ताने १४ मे, २००९ रोजी विद्यापीठात माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व पद्मभूषण श्री. अण्णा हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी समर्थ भारत अभियानाच्या दोन वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्षीय पदावरून बोलताना ते म्हणाले, एखादे अभियान चळवळीच्या स्वरूपात येताना त्या चळवळीला विरोध झाला तर ते काम चांगले आहे असे समजावे. विरोध करणारे लोक सुरुवातीला विरोध करतात, कुंपणवरून डोकावतात, मग विचारणा करतात आणि चौथ्या टप्प्यात ते या चळवळीत सहभागी होतात. अशाच चळवळी मोठ्या झालेल्या आपण पाहिल्या आहेत. आणि म्हणूनच कसल्याही विरोधाला न जुमानता 'समर्थ भारत अभियान'मध्ये सर्व घटकांनी झोकून देऊन काम केले पाहिजे. या प्रसंगी महात्मा गांधींच्या जीवनातील काही प्रसंग आणि विनोबाजींचे काही किस्से सांगून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्वातंत्र्य मिळून ६१ वर्षे झाली तरी आमची खेडी आहे तशीच आहेत. विवेकानंदांच्या चारित्रलेखनातून प्रेरणा मिळाल्याने जीवनाचे रहस्य उलगडले व 'सेवा'व्रत स्वीकारून समाजसेवेसाठी झोकून दिल्याचे नमूद केले. समर्थ भारत अभियान संकल्पना अत्यंत प्रभावी असून महाविद्यालयांनी एकात्मिक ग्रामीण विकासासाठी केलेला प्रयत्न व त्यातील युवकांचा सहभाग पाहून अजूनही समर्थ भारताच्या उभारणीची आशा वाटते. विद्यापीठ शिक्षणाबरोबर समाजसेवेचाही वसा विद्यार्थ्यांना देत आहे. याचे मूल्य पैशात करता येणार नाही. असे प्रतिपादन पद्मभूषण श्री. अण्णा हजारे यांनी या प्रसंगी केले. महाराष्ट्रात किमान १०० आदर्श खेडी निर्माण करण्याचा माझा प्रयत्न आहे. या संदर्भात मी सरकारबरोबर चर्चा केली आहे. या कामाला आपल्या समर्थ भारत अभियानाची जोड मिळाली तर ते अधिक चांगले होईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तत्पूर्वी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी समर्थ भारत अभियानाची भूमिका स्पष्ट केली. आणि समर्थ भारत अभियानअंतर्गत जी कामे झालेली आहेत त्यांचा आढावा घेतला. विशेषत: इतिहास लेखनाबद्दल मन:पूर्वक कौतुक केले. हे अभियान राबवीत असताना ६३ वेगवेगळ्या सभांमध्ये ही योजना कशी राबविली जात आहे आणि ती विद्यार्थ्यांपर्यंत कशी पोहोचली याचे विस्तृत विवेचन त्यांनी केले. प्रा. गणेश राऊत यांनी दत्तक गावांचा इतिहास खंड २ ची माहिती दिली.

डॉ. अरुण अडसूळ यांचा या प्रसंगी मा. कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते प्र–कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्यांनी आपल्या भाषणात समर्थ भारत अभियानचा संपूर्ण आढावा घेतला आणि हे अभियान चळवळीच्या स्वरूपात कसे सिद्ध होत आहे ते सोदाहरण स्पष्ट केले.

या प्रसंगी डॉ. अरुण अडसूळ यांनी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समाजाभिमुख व विद्यार्थीभिमुख या संकल्पनेला जोरकस पाठिंबा दिला. डॉ. अरुण अडसूळ लिखित समर्थ भारत अभियान या गीताच्या ऑडिओ सी.डी.चे प्रकाशन या वेळी करण्यात आले. ४१ गावांच्या इतिहासलेखनाच्या खंड–२ चे प्रकाशन माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते व श्री. अण्णा हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच, विद्यार्थी कल्याण मंडळाचे 'चेतना' या त्रैमासिक विद्यार्थी वार्ता व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक अहवालाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संभाजी पठारे यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. संजय चाकणे यांनी केले. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. पंडित विद्यासागर आणि कुलसचिव डॉ. माणिक जाधव, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, अनेक प्राध्यापक, व सुमारे ३०० विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## आनंदवन 'व्यक्तिमत्त्व विकास व श्रमसंस्कार शिबिर' :



मागील तीन वर्षांपासून पुणे विद्यापीठाचे ३०० ते ४०० विद्यार्थी आनंदवन, सोमनाथ प्रकल्पास दरवर्षी भेट देत आहेत. कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या संकल्पनेतून ही योजना सुरू झाली. या वर्षी दि. १४ ते २४ मे ०९ दरम्यान ३०० विद्यार्थ्यांचा चमू सोमनाथ येथील 'व्यक्तिमत्त्व विकास व श्रमसंस्कार शिबिरासाठी रवाना झाला. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, पद्मभूषण श्री. अण्णा हजारे, कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, प्र–कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी आनंदवनला जाणाऱ्या गाड्यांना हिरवा झेंडा दाखविला. विद्यार्थ्यांबरोबर विविध महाविद्यालयांतील १० प्राध्यापक या वेळी उपस्थित होते.

१८ तास प्रवास करून स्वयंसेवक सोमनाथ येथे पोहोचले. नाथांच्या पादस्पर्शाने पुनित झालेली भूमी म्हणजे सोमनाथ. परंतु, देव दगडात नसून मानवात आहे. आणि तेथील देव म्हणजे कुष्ठरोगी. व या देवांना खऱ्या अर्थाने गळ्याशी लावणारे महामानव म्हणजेच बाबा आमटे व आमटे परिवार. सोमनाथ म्हणजे जंगलमय वातावरणात मंगलमय काम.

सोमनाथ या ठिकाणी पुणे विद्यापीठाच्या विविध संलग्न महाविद्यालयांतील ३०० स्वयंसेवकांनी दररोज स. ५ ते रात्री ९ या वेळेत श्रमदान करून तेथील बंधारादुरुस्ती केली. एक नवीन रस्ता तयार केला. तसेच परिसराची स्वच्छता, बांधावर दगडाचे ढीग घातले. हे श्रमदान करताना तेथील ४७ डिग्री तापमानही स्वयंसेवक विसरले. सोमनाथ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, त्यामध्ये ९० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. तसेच, सोमनाथ येथील जंगलात विद्यार्थ्यांनी सुमारे ३ कि.मी. अंतर पायी चालून ३००० बियांचे बीजारोपण केले. टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ काम करताना विद्यार्थ्यांनी टायरपासून बंधारा बांधला व टायरपासूनच कुष्ठरोग्यांचे स्मारकही उभारले.

### अभिप्राय

आपण पाठविलेला 'चेतना' विद्यार्थी वार्ता अंक प्राप्त झाला. विद्यापीठ राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती या अंकाद्वारे शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना मिळू शकते. या अंकामध्ये विशेषत: आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, आविष्कार स्पर्धा, अश्वमेध स्पर्धा, वनराई बंधाऱ्यांची निर्मिती, ऊर्जा दिंडी, आदी उपक्रमांची माहिती या अंकाद्वारे मिळते. त्याचप्रमाणे विविध महाविद्यालयांपैकी आविष्कार स्पर्धेत विजयी ठरलेले स्पर्धक या अंकातून समजले. या स्पर्धेत भाग घेतलेल्या प्रत्येक स्पर्धकाच्या मनामध्ये अंतिम विजेतेपद कोणास मिळते या विषयी उत्सुकता असते. या अंकाद्वारे ती माहिती प्रसिद्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांना ती समजल्याने कोणते संशोधन प्रकल्प श्रेष्ठ ठरले हे माहिती होऊ शकते. त्यांच्या संशोधनवृत्तीस दिशा मिळू शकते. एवढी महत्त्वाची माहिती 'चेतना' या अंकाद्वारे विद्यार्थ्यांना मिळवून देण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न निश्चितच स्पृहणीय आहे. दरवर्षीच्या उपक्रमांवर आधारित अशाच प्रकारचा अंक यापुढे नियमित प्रकाशित व्हावा असेच सुचवावेसे वाटते.

**प्राचार्य, पी. ए. लवांडे**
श्री छत्रपती शिवाजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, श्रीगोंदा, जि. अ'नगर.

*Thank you very much for sending issues of 'Chetana'*
As the title suggest, the magazine is really inspiring to the students. Chetana Magazine gives confidence to students to take participation in various activities run by Pune University. It also helps to keep update the students about the events occurring in the Pune University. This gives encouragement to do more innovative things to students as well as faculty by reading the inspirational and challenging activities of various colleges. After going through Chetana magazine one can increase one's stamina, can know one's potential for further development.
We wish all the success and support for continuation of the magazine in future.

**Mrs. Chanda N. Supekar**
Librarian,
Marathwada Mitra Mandal's College of Engineering, Pune.



# SWINE FLU

## Frequently Asked Questions :

**Q: What is swine flu?**

A: It's a common respiratory disease in pigs that doesn't usually spread to people. When pigs catch this flu, many get quite sick, and 1% to 4% die, according to the World Health Organization.

**Q: How is this swine flu virus different?**

A: This strain appears to be a subtype not seen before in humans or pigs, with genetic material from pigs, bird and humans, according to WHO. Unlike most cases of swine flu, this one can spread from person to person.

**Q: How do you catch it?**

A: You can get sick if someone coughs near you, because the disease spreads through microscopic respiratory droplets. You also can get sick from touching a surface where droplets have landed, then touching your mouth or eyes. Although people are contagious before they show symptoms, they are most likely to spread the virus when they're coughing.

**Q: Were pigs the carriers of this virus?**

A: It's closer to say that pigs were the mixing bowl for this virus. Birds can't pass bird flu to people. But pigs are uniquely susceptible to getting flu viruses that infect birds. Experts have long worried that a pig would catch a bird strain of the flu and then the virus would mutate inside the pig to a form that could also infect other mammals. Pigs can also be infected with more than one influenza virus at a time, allowing the viruses to share genes, called 'genetic reassortment', creating new and potentially much more virulent viruses.

**Q: What are the symptoms?**

A: The most common symptoms are fever, fatigue, lack of appetite and coughing, although some people also develop a runny nose, sore throat, vomiting or diarrhea.

**Q: What should you do if you have these symptoms?**

A: Stay home from work or school, to avoid spreading your illness to other people. Don't get on an airplane. People should call their doctors to ask about the best treatment, but should not simply show up at a clinic or hospital that is unprepared for their arrival.

**Q: How can people protect themselves?**

A: As always, people should wash their hands frequently. Surgical masks are designed to prevent the wearer from spreading germs, but may also catch large respiratory droplets if someone sneezes nearby. N95 respirator masks filter out 95% of particles to prevent the wearer from breathing them in.

These must be fitted properly around the nose to create a seal, so they can make breathing difficult.

**Q: What is the incubation period for the flu?**

A: In most cases, infected people develop symptoms within one to four days.

**Q: Should people who have recently travelled to affected area be concerned?**

A: Only if they have flulike symptoms, such as a fever, cough and body aches, or in some cases vomiting. If it has been more than a week since you returned from affected area and you aren't sick, you can relax.

**Q: What should you do if you have flu symptoms?**

A: Stay home. Don't go to work, school or travel until you've been free of symptoms for a day. If possible, ask in advance about working from home in case you or family members become ill. A small number of people are at higher risk, because they have had close contact with someone who has.

Those who don't fit that profile probably have an ordinary flu. Most people can recover from the flu just fine at home. Stay in bed, drink lots of fluids and take acetaminophen for pain. Wash your hands frequently, and cover your mouth when you cough.

**Q: When should you call the doctor?**

A: If you're sick or have close contact with someone who has, call your doctor for advice about being tested and treated. Patients should see a doctor if they have trouble breathing, vomit uncontrolably, become delirious or have other types of 'altered mental status'.

**Q: When should you use a mask?**

A: There are two main types of masks :.

- Simple surgical masks are designed to keep germs in to prevent someone from coughing and spreading the virus.
- N95 respirator masks are designed to keep germs out and protect people from breathing in the flu virus.

There isn't definitive evidence that masks will keep people from getting sick. That's partly because respirators must be carefully fitted over the nose and mouth to ensure a tight seal, which can make it harder to breathe.

**Q: Is there a vaccine against swine flu?**

A: No, but government scientists are trying to create one.

**Q: What about antivirals? Can they prevent swine flu?**

A: This strain of swine flu does appear sensitive to the antiviral drugs Relenza and Tamiflu, but not to amantadine, or Symmetrel, and rimantadine, or Flumadine. With normal seasonal flu, if taken within the first 48 hours after symptoms appear, antivirals can help people recover a day or two sooner. Doctors sometimes prescribe antivirals to household members of people with the flu to prevent them from getting sick.

(Ref. : Richard Besser, Acting Director, CDC and Martin Blaser, President, IDS, USA at a press conference.)

## जयकर ग्रंथालय :

१९४९ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर १९५० मध्ये विद्यापीठाच्या ग्रंथालयाची सुरुवात प्रथमत: मुख्य इमारतीत झाली. ग्रंथालयाच्या अस्तित्वाची स्वतंत्र खूण म्हणजे ग्रंथालयाची इमारत. त्यानंतर सात वर्षातच ग्रंथालयाची वेगळी इमारत १९५७ मध्ये उभारली गेली. तत्कालीन उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या शुभहस्ते या भव्य इमारतीचे उद्घाटन होऊन ग्रंथालय नव्या इमारतीत कार्यान्वित झाले. विद्यापीठाच्या ग्रंथालयास पहिल्या कुलगुरूंचे म्हणजे बॅ. जयकरांचे नामाभिधान प्राप्त झाले व पुणे विद्यापीठाचे ग्रंथालय 'जयकर ग्रंथालय' म्हणून ओळखले जाऊ लागले.

- **ग्रंथसंपदा** : विद्यापीठाच्या प्रगतीच्या अनुषंगाने ग्रंथालयाचीही वाढ झाली. संख्यात्मक व गुणात्मकसुद्धा! ग्रंथालय म्हणजे वाचक, ग्रंथसंपदा व सेवकवर्ग यांचा त्रिवेणी संगम. विद्यापीठ ग्रंथालयाचे वाचक आजमितीस तीन हजारांहून जास्त आहेत. ग्रंथालयाची ग्रंथसंपदा (ज्यात पुस्तकांशिवाय नियतकालिके, प्रबंध, हस्तलिखिते, छायाचित्रे, दृक्–श्राव्य कॅसेट्स, संगीत ध्वनिमुद्रिका यांचा समावेश होतो.) चार लाखांहूनही जास्त ठेवा आहे. ग्रंथालयाचे वाचक व ग्रंथसंपदा यांतील दुवा म्हणजे ग्रंथालयाचे सेवक. आज ग्रंथालयात तांत्रिक सेवकांची संख्या ३५ च्या आसपास आहे.
- **आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर** : आजच्या युगात या त्रिमितीत समन्वय साधन्यासाठी आधुनिक संगणक व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर होतो. जयकर ग्रंथालयानेही ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी, त्याचे सुसूत्रीकरण करण्यासाठी, वाचकांपर्यंत ग्रंथसंग्रह सुलभतेने पोचविण्यासाठी अद्ययावत ग्रंथसामग्री व आधुनिक तंत्रज्ञनाचा वापर केला आहे. 'LIBSYS' या सॉफ्टवेअरचा उपयोग करत ग्रंथालयाने 'RFID' या तंत्राने ग्रंथदेवघेव सुलभ केली आहे. ग्रंथसंपदेच्या नवनवीन स्वरूपाचेही ग्रंथालयाने स्वागत केलेले आहे. इंटरनेटवर उपलब्ध असलेली इलेक्ट्रॉनिक नियतकालिके ग्रंथालयात यूजीसी इन्फोनेटच्या सहकार्यामुळे वाचकांपर्यंत पोचत आहेत.
- **ऑन्लाइन सुविधा** : जयकर ग्रंथालयाने विद्यार्थी, संशोधक, संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांना उपयोगी होईल यासाठी Portal सुरू केले आहे. त्यात विषयवार ऑन्लाइन उपलब्ध असलेले ग्रंथ, नियतकालिके व इतर संदर्भ ग्रंथ महत्त्वाच्या ग्रंथालयांचे कॅटलॉग, इ. उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना अशा अद्ययावत सेवा या मा. बी. जी. देशमुख यांच्या सौहार्दपूर्ण देणगीतून उभारलेल्या श्रीमती विजया देशमुख इंटरनेट केंद्रातून मिळत आहे.
- **डिजिटल लायब्ररी** : ग्रंथालयाने डिजिटल लायब्ररीचा प्रकल्प कार्नेजी मेलॉन विद्यापीठ व IISC बंगळूर यांच्या सहकार्याने राबविला आहे. ज्यात जुन्या ग्रंथांचे अंकीकरण करण्यात आलेले असून सदरचे ग्रंथ डिजिटल लायब्ररी ऑफ् इंडिया या संकेतस्थळावर उपलब्ध होता येते.
- **वाचन कक्ष** : ग्रंथालयात अनेक बाबींबरोबर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी १८ ते २४ तास खुले ठेवण्यात येणारे वाचनकक्ष उभारलेले आहेत. विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय विद्यापीठाप्रमाणेच भारतातील एक उत्तम ग्रंथालय आहे. कारण, अशी बिरुदावली ग्रंथालयास भारतीय ग्रंथालय संघाने प्राप्त करून दिली आहे.

## Department of Chemistry

**Guest Lectures :**

- A lecture by Professor Henry Schaefer (III) was organized on Thursday, February 05, 2009 for the students and teachers of Chemistry. He is an eminent scientist of Theoretical and Computational Chemistry from the University of Georgia, USA and published more than 1200 papers, majority appearing in the Journal of American Chemical Society and Journal of Chemical Physics. Subject of his talk was 'The Worldviews of Great Scientists and The significance and Development of Computational Chemistry'.
- A lecture of Prof. M. Palaniandavar (School of Chemistry, Bharatidasan University, Tiruchirapalli) was organized. The topic of lecture was 'Metals in Biology and Medicine : DNA Binding and Anticancer activities of Copper (II) and Ruthenium (II) Complexes of Imines' on Saturday, 7th February, 2009.

**Women's Day :** On account of Women's day, Indian Women Scientists' Association (IWSA), Pune branch in collaboration with Chemistry Department, Pune University had organized a lecture of Dr. Anjana Desai, Professor and Head, Microbiology Department, M. S. University, Baroda on 7th March, 2009. The topic was Bioremediation. The convener of IWSA Pune branch Prof. Neelima Rajurkar took sincere efforts in organizing this lecture.

**Science Day :** A lecture and film show on 'Chincholi Morachi' and 'Battis Shirala' was organized by Mr. Bal Damale, EMRC, Pune in the Department of Chemistry on Saturday, 28 February, 2009 at P. C. Ray Hall of the Department.

**Best Poster Prize** : Mrs. Vrushali S. Joshi, research student working under the guidance of Dr. S.K. Haram has got 'Best Poster Presentation Prize' in International Workshop on Nanotechnology and Advanced Functional Materials held on July 09-11,2009 at N.C.L. , Pune.

## Department of Education & Extension



The Department of Education & Extension has conducted various activities like personality development workshop for M.Ed Students, Participation in National and State level conference, Celebration of National Education day and has given opportunity for students to interact with teachers of Telemark University, Norway.

**Personality Development workshop:** A six days workshop was organized between 17 to 22 Nov. 2008. Eminent personalities like Mr. Tawade, Dr. Ram Gaikwad and Mr. Vandan Nagarkar enlighted M.Ed. students about personality development. The major emphasis was on self concept, SWOT analysis, various skills, positive attitude, time and stress management, meditation. This workshop was found to be very useful for the participants.

**National conference :** The Department gave golden opportunity to its M.Ed., M.Phil. & Ph.D. students to participate and present their research papers in National level Educational Conference held between 23-25 January, 2009 which was organized by Vidya Pratishthan's College of Education, Baramati. Two M.Ed. Students, Ms. Kiran Kapoor and Mr. Narendra Sidhaye bagged first and second prize respectively for their papers presented in this conference.

**The National Education Day :** National education day in the memory of first Education Minister of Independent India, Moulana Abul Kalam Azad was celebrated on 11th November, 2008. M.Ed. students highlighted their educational contribution with PowerPoint presentation. H.O.D. Prof. S. A. Sonawane conducted the programme.

**Visit of Telemark University Delegation :** The students and teachers form Telemark University, Norway visited India to get a deep insight about the world famous Indian culture. They visited Department of Education & Extension on 19th February, 2009. The students from both Universities exchanged their views about curriculum, teaching programme, problems faced, traditions, culture, etc.

## Blind Students' Learning Centre :



Department of Education & Extension has developed Advanced technology blind students' learning centre as its extension work.

**New Course M.A. (Education) :** Department of Education and Extension is progressing successfully. From this academic year 2009-10, a new Credit based two- year course M.A.(Education) has been introduced.

**Part Time Certificate Course in basic computing for visually challenged college students :** Advanced Technology Blind Students' Learning Centre, Department of Education and Extension, University of Pune is going to introduce a part time certificate course in basic computing and assistive technology learning (CBCATL) especially for visually challenged college students from July 2009. Computer aided assistive technology has brought revolution in the life of visually challenged people. They can operate computers effectively using computer screen reader. The basic objective of introduction of the course is to increase accessibility of overall educational system to visually challenged students by training them for the use of computer as all course material can easily be available in electronic format. The course will provide insight knowledge of use of computer aided assistive technology devices and its application in education. It will enable all visually challenged students of any discipline to make them independent in not only education but also in their career. The course will also give knowledge of application of computer to visually challenged people in various field and day to day life activities which will enrich their life. Visually challenged students persuing any regular degree or diploma course can study the course simultaneously along with their degree course to which they are enrolled. The course will also be beneficial to parents of visually challenged Students, their teachers, researchers and academicians, assistive technology developers and people working for welfare of visually challenged.

| | |
|---|---|
| Duration : | Six months, 4 to 5 hours a week. |
| Course commencement : | Every year in the month of June and January. |
| Course Eligibility : | H.S.C. (Arts, Science, Commerce) or equivalent Certification from recognized board of education. |
| Number of Seats : | 20 max. |
| Selection criteria : | On the basis of merit in qualifying exam. |

## राज्यशास्त्र विभागाचे उपक्रम

### पुणे विद्यापीठात राज्यशास्त्र विभागामार्फत २००८-०९ मध्ये खालील उपक्रम राबविण्यात आले :

**'राज्यशास्त्र परिचय कार्यशाळा' :** एम. ए. भाग १ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'राज्यशास्त्र परिचय' या विषयावरील दोन–दिवसीय (दि. ३० व ३१ जुलै, २००८) कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत विभागातील प्राध्यापकांनी राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना व अभ्यासक्रमाची तोंडओळख करून दिली.

**भाषाकौशल्य विकास :** इंग्रजी व मराठी भाषाकौशल्याचा विकास करण्यासाठी दोन–दिवसीय (दि. १ व २ ऑगस्ट, २००८) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत धनवंती हर्डीकर, भाषा अधिकारी, बालभारती आणि प्रा. मृणालिनी शहा (मराठी विभाग, मॉडर्न महाविद्यालय) यांनी मार्गदर्शन केले.

**वर्धा येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग :** सर्वोदय मंडळ, वर्धा आयोजित 'हिंद स्वराज्य शताब्दी' निमित्त आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ( दि. १७ ते १९ ऑक्टोबर, २००८) राज्यशास्त्र विभागातील दीपक खिल्लारे व पूनम आदक यांनी सहभाग घेऊन चर्चेत भाग घेतला.

**'डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा' व्याख्यान :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनानिमित्त दि. ९ डिसेंबर, २००८ रोजी श्री. किशोर बेडकीहाळ (संस्थापक, डॉ. बाबासाहेब आंबंडकर अकादमी, सातारा) यांचे 'आंबेडकरांचा वैचाारिक वारसा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून 'बुक क्लब' :** विभागातील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन नियमितपणे सुरू असलेला वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे 'बुक क्लब' व 'फिल्म क्लब.' महिन्यातील पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी सामाजिक व राजकीय विषयावरील माहितीपट दाखविला जातो. तर महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी विषयाशी संबंधित पुस्तकांवर विद्यार्थी स्वतःचे मत मांडतो.

**लोकसभा मतदारसंघ सर्वेक्षण :** राज्यशास्त्र विभाग आणि लोकनीती यांच्यामार्फत लोकसभा निवडणूक २००९ संदर्भात महाराष्ट्रातील लोकसभा मतदारसंघात सर्वेक्षण करण्यात आले. त्यात विभागातील ५० विद्यार्थी सहभागी झाले.

**साने गुरुजी स्मारकास विद्यार्थ्यांची भेट :** विभागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभ्यास सहल मार्च २००९ मध्ये आयोजित करण्यात आली. त्यात रायगडमधील सेझ प्रकल्प आणि माणगाव (वडघर) साने गुरुजी स्मारकास भेट देण्यात आली. या अभ्यास सहलीत ५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.




**" आमचंच शिबिर....... आमचंच आयोजन" :** दि.२८ जानेवारी ते ६ फेब्रवारी, २००९ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे 'श्रमसंस्कार शिबिर' मु.पो. सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे या ठिकाणी पार पडले. या कालावधीत पार पडलेल्या शिबिरातील विद्यार्थ्यांनी व्याख्याने आणि त्यांचेच अनुभव कथन करणारी पुस्तिका प्रकाशित केली. या पुस्तिकेचे नाव 'आमचं शिबिर....... आमचंच आयोजन' असे आहे. या पुस्तिकेचे संपादन बांगर बालाजी, गव्हाणे नानासाहेब, खोमणे सुनील व मिरजकर पल्लवी. या एम.ए. मराठी विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी केले. या पुस्तिकेचे प्रकाशन डॉ. नरेंद्र जाधव, कुलगुरू, पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. अरुण अडसूळ, डॉ. संभाजी पठारे, प्रा. ठकाजी कानवडे, प्रा. नंदकुमार निकम, डॉ. संजय चाकणे, प्रा. बाबासाहेब दुधभाते, आदी उपस्थित होते.

## विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्राविषयी :

**१. बेरोजगार उमेदवारांची नावनोंदणी करून त्यांना नोकरीच्या सुसंधी तसेच स्वयंरोजगारविषयक मार्गदर्शन करणे :**
रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत रोजगार व स्वयंरोजगार साहाय्य मागणाऱ्या बेरोजगार उमेदवारांची नोंदणी करणे, उद्योजकांकडे कामगारांसाठी आलेल्या मागण्यांची नोंद करून त्यांना योग्य उद्योजकांकडे पाठविणे, तसेच स्वयंरोजगारास इच्छुक असलेल्या उमेदवारांना विविध व्यवसाय, त्यांसाठी लागणारे प्रशिक्षण, व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळण्याकरिता मार्गदर्शन व पाठपुरावा, तसेच व्यवसायाकरिता विविध महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयक माहिती देणे, बेरोजगारांना स्वयंरोजगारांस प्रवृत्त करणे, इ. महत्त्वाच्या कामांचा यांमध्ये समावेश होतो.

**२. सेवायोजन क्षेत्र माहिती (एम्प्लॉयमेंट मार्केट इन्फर्मेशन) :**
प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत त्या जिल्ह्यात असलेल्या सर्व शासकीय आस्थापना, त्याचप्रमाणे सर्वसाधारणपणे १० पेक्षा जास्त कर्मचारी संख्या असलेल्या सर्व खाजगी आस्थापनांमध्ये असलेल्या मनुष्यबळाची संख्या दर तिमाहीत गोळा केली जाते. त्याचप्रमाणे या आस्थापनांमधील व्यावसायिक व शैक्षणिक वर्गीकरणानुसार असलेल्या मनुष्यबळाविषयक माहिती दरवर्षीने नियमितपणे संकलित करणे, नवीन आस्थापनांचा शोध घेऊन त्यांमध्ये असलेल्या रोजगारांचा, स्वयंरोजगारांचा शोध घेणे व त्याप्रमाणे बेरोजगारांना मार्गदर्शन करणे, इ. कामांचा यांमध्ये अंतर्भाव होतो.

**३. व्यवसाय मार्गदर्शन (व्होकेशनल गाइडन्स) :**
युवकांना त्यांची आवड, कल, आकांक्षा आणि शैक्षणिक अर्हता तसेच त्यांची समस्या जाणून घेऊन त्यांना शिक्षण, प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, व्यवसाय व नोकरीची संधी यांबाबत माहिती व मार्गदर्शन करून साहाय्य करणे, इ. कामांचा यांमध्ये अंतर्भाव होतो. यांकरिता सर्व कार्यालयांमध्ये उमेदवारांना वाचनसाहित्य उपलब्ध करून दिले जाते व लायब्ररीची सुविधादेखील उपलब्ध करण्यात आली आहे.

**४. रोजगार प्रोत्साहन योजना (एम्प्लॉयमेंट प्रमोशन प्रोग्रॅम) :**
विविध व्यवसायांच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांचे कौशल्य व पात्रता वाढवून त्यांना नियमित रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना रोजगार मिळावा किंवा स्वतंत्रपणे स्वयंरोजगार सुरू करणे शक्य व्हावे याकरिता महाराष्ट्र शासनाने ही योजना सुरू केली आहे. दरवर्षी या योजनेतून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढती असून उमेदवारांना रु. ३००/– ते १०००/– पर्यंत विद्यावेतन त्याचप्रमाणे प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. या योजनेकरिता दरवर्षी शासन जवळजवळ एक ते दीड कोटी रुपये खर्च करीत आहे. या योजनेची फलनिष्पत्तीही चांगली आहे.

**५. अपंगार्थ विशेष रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र :**
केंद्र शासनाच्या अपंगांकरिता असलेला अपंग व्यक्ती कायदा १९९५ मधील तरतुदींनुसार अपंग उमेदवारांना नोकरीविषयक व स्वयंरोजगारविषयक माहिती, मार्गदर्शन व साहाय्य करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात अपंगार्थ विशेष रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र आहे. या केंद्रामध्ये अपंग उमेदवारांची नावनोंदणी करणे, तसेच त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता विशेष प्रयत्न केले जातात. स्वयंरोजगार इच्छुक अपंग उमेदवारांना व्यवसाय मार्गदर्शन, अपंगांना प्रशिक्षणाची व्यवस्था कोठे आहे, तसेच त्यांना व्यवसायाकरिता आर्थिक मदत मिळविण्याच्या दृष्टीने पाठपुरावा, इ. कामे या केंद्रामार्फत केली जातात.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
दूरध्वनी क्र. : ०२०–२५६९०४३८
इ–मेल : vidyapith_pune@yahoo.co.in
वेबसाइट : http://ese.mah.nic.in



दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि. अहमदनगर येथील राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी समर्थ भारत अभियानांतर्गत गावातील बालकांना पल्स पोलिओचे लसीकरण करताना :

# Extra-Curricular

## क्रीडाक्षेत्रातील पुरस्कार

भारत सरकारच्या वतीने क्रीडाक्षेत्रातील सर्वोच्च असणारा 'अर्जुन पुरस्कार' पुणे विद्यापीठाचे माजी कबड्डी खेळाडू व भारताच्या कबड्डी संघाचे कर्णधार पंकज शिरसाठ यांना नुकताच प्राप्त झाला आहे. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रीडाक्षेत्रासाठी देण्यात येणारा 'श्री शिव छत्रपती पुरस्कार' खालील खेळाडूंना प्राप्त झाला आहे.

**अर्जुन पुरस्कार**



पंकज शिरसाठ
कबड्डी

**सन २००६–०७ साठी**



कु. रूपाली मि. शिंदे
खो–खो

**सन २००७–०८ साठी**



मनोज एरंडे
पोहणे



कु. शीतल मारणे
कबड्डी



कु. केतकी बकोरे
मैदानी स्पर्धा



कु. रूपाली भा. शिंदे
डायव्हिंग



कु. मनीषा गारगोटे
हॅण्डबॉल



## जागतिक बाइक स्पर्धेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रभारी कुलगुरूंकडून अभिनंदन :


पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'टॉर्क इंडिया' या बाइकला इंग्लंडमधील जागतिक पातळीवरील बाइक रेसिंग स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाला. पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी कपिल शेळके, केतन म्हसवडे, कुणाल नानावटी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या विद्यार्थ्यांनी बॅटरीवर चालणाऱ्या या बाइकची माहिती दिली. 'टीटीएक्सजीपी' संस्था जागतिक पातळीवर बाइक व कार रेसिंग स्पर्धेचे आयोजन करते. या स्पर्धेत १७ देशांमधील स्पर्धक सहभागी झाले होते. ही स्पर्धा ६० किलोमीटर अंतरासाठी घेण्यात आली होती. या स्पर्धेत अनेक नामवंत ॲटोमोबाइल कंपन्यांच्या बाइक सहभागी होत असतात. यांमध्ये इंग्लंड, जर्मनी, नॉर्वे, अमेरिका, स्विडन येथील स्पर्धकांनी भाग घेतला होता. या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या बाइकचा वेग ताशी १५६ कि.मी. आहे. तर तिची रेंज ७० कि.मी. आहे. भारतातून प्रथमच विद्यार्थी अशा स्पर्धेत सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना ही बाइक तयार करण्यासाठी चिंचवड येथील तिरुपती इंजिनिअर्सचे श्री. चंद्रकांत शेळके व भोसरी येथील सन सर्व्हिसेसचे सहकार्य मिळाले.

पुणे विद्यापीठाचा नावलौकिक वाढविण्याचे काम या विद्यार्थ्यांनी केले आहे. ॲकडेमिक शिक्षणाचा व्यवहारामध्ये उपयोग करून केवळ नोकरी न करता व्यावसायिक दृष्टिकोन बाळगून रोजगारनिर्मिती करता येऊ शकते आणि राष्ट्राचा गौरव वाढविता येतो हे या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे, असे प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी सांगितले. कुलगुरूंनी ही गाडी स्वत: चालवून पाहिली. याप्रसंगी डॉ. संजय चाकणे, डॉ. के. सी. मोहिते, प्रा. पंडित शेळके, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## शैक्षणिक वर्ष २००८-०९ मधील विविध परीक्षांमध्ये प्रथम आलेले विद्यार्थी

| अ. क्र. | परीक्षेचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | बी. ए. | जोशी मैथिली विठ्ठल | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे |
| २. | बी. कॉम. | निखिल भारत गोयल | न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर |
| ३. | बी. एस्सी. | स्मश्ती शरदचंद अभ्यंकर | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे |
| ४. | बी. एस्सी. (संगणक) | रीमा शिरीष देवधर | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे |
| ५. | बी. एड. जनरल | देबोश्री अमलकुमार जाना | आझम कॉलेज, पुणे |
| ६. | बी. एड. फिजिकल | कुमार कश्ष्णानंद उपाध्याय | चंद्रशेखर आगाशे कॉलेज, पुणे |
| ७. | एलएल. बी. (तीन–वर्षीय अभ्यासक्रम) | प्रज्ञा परिहार | आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे |
| ८. | एलएल. बी. (पाच–वर्षीय अभ्यासक्रम) | निशिथा काचोला | आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे |
| ९. | एम. ए. | धामणे सुवर्णा पंढरीनाथ | के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक |
| १०. | एम. सी. एम. | तनुजा भमराव चौगुले | अल्लाना इन्स्टिट्यूट, कॅम्प, पुणे |
| ११. | एम. बी. ए. | जयश्री दोशी | सिंहगड इन्स्टिट्यूट, कोंढवा बु., पुणे |
| १२. | एम. सी. ए. | चंदन अजय सिंग | इंदिरा इन्स्टिट्यूट, पुणे |
| १३. | एल. एल. एम. | युमखाम थाजमान्बी | विधी विभाग, पुणे विद्यापीठ |
| १४. | एम. पी. एम. | अली इश्राफिल | आय.बी.एम.आर., चिंचवड, पुणे |
| १५. | एम. एम. एम. | अमित कुमार शर्मा | सिंहगड इन्स्टिट्यूट, वडगाव, पुणे |
| १६. | एम. एड. जनरल | अश्विनी विनायक पेंढारकर | एम. एड. विभाग, पुणे विद्यापीठ |
| १७. | एम. एड. फिजिकल | अंजुश्री जयराम सावंत | चंद्रशेखर आगाशे कॉलेज, पुणे |

## डॉ. नरेंद्र जाधव यांची नियोजन आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती :



पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांची नुकतीच भारत सरकारच्या नियोजन आयोगाच्या सदस्यपदी निवड झाली असून दि. १६ जून, २००९ रोजी या पदावर ते रुजू झाले आहेत. दि. २४ ऑगस्ट, २००६ ते १५ जून, २००९ या सुमारे तीन वर्षांच्या कार्यकालात त्यांनी 'समर्थ भारत अभियान' ही एकात्मिक ग्रामीण विकासाची चळवळ सुरू केली. याबरोबरच 'कमवा व शिका' योजनेचे सबलीकरण करणे, विद्यार्थिनींसाठी क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती सुरू करणे, सर्व अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, महाविद्यालयीन स्तरावर संशोधनासाठी भरीव अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, इ. महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.गुरुवार, दि. १३ जून, २००९ रोजी पुणे विद्यापीठाने त्यांचा नियोजन आयोगावर नियुक्ती झाल्याबद्दल यथोचित गौरव केला. या वेळी शेकडो संस्था व व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले. या विशेष समारंभाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या वेळी विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने हजर होते.

## कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत राजूर महाविद्यालयात युरिया ब्रिकेट्स (रासायनिक गोळी खत) प्रकल्प :



भात पिकासाठी आवश्यक असलेल्या नत्र (N) व स्फुरद ($P_2O_5$) या रासायनिक खतांचे २ : १ प्रमाणात मिश्रण करून त्याची गोळी (कॅप्सूल) तयार करण्याचा प्रकल्प कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत राजूर येथील अॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पाचे उद्‌घाटन विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे यांच्या शुभहस्ते शनिवार, दि. १७ जुलै, २००९ रोजी संपन्न झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य टी. एन. कानवडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. एल. बी. काकडे, प्रा. व्ही. एन. गिते, व कमवा व शिका योजनेतील विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. श्री. जयराम इंदे यांनी विद्यार्थ्यांना युरिया ब्रिकेटस् निर्मितीचे प्रशिक्षण दिले. युरिया ६०: व डी.ए.पी. ४०: याप्रमाणात एकत्र करून त्याची कॅप्सूल तयार करण्यात येते. एका रोपासाठी एक कॅप्सूल या प्रमाणात युरिया ब्रिकेट्सचा वापर करण्यात येतो. भात पिकाव्यतिरिक्त कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, वांगी, घेवडा, ऊस, इ. पिकांसाठी युरिया ब्रिकेट्सचा वापर गेल्या दहा वर्षापासून प्रचलित आहे. शेतकऱ्यांनी आणलेल्या कच्च्या मालापासून ब्रिकेट्स तयार करून देण्याचे काम या महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थी करत असल्याने राजूरच्या आदिवासी भागातील शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा लाभ झाला असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य टी. एन. कानवडे यांनी सांगितले. ब्रिकेट्समुळे खताची बचत होते व पर्यायाने खर्चातही बचत होते. तणाचा व पर्यावरण प्रदूषणाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होत असल्याने व ही सुविधा महाविद्यालयात उपलब्ध झाल्याने या भागातील बहुतांश शेतकरी आता युरिया ब्रिकेट्सचा वापर करत आहेत.

## Achievements of AISSMS College of HMCT: National 'Hospitality Ensemble'



The students of All India Shri Shivaji Memorial College of Hotel Management and Catering Technology participated in 'Hospitality Ensemble'- an Inter-Collegiate Hospitality Competition organized by Banarasidas Chandiwala IHMCT, New Delhi, at the National level. This competition was aimed at showcasing talent and creativity of students in core areas of Hospitality namely Food production, Food and Beverage Service, Facility Planning and Flower Arrangement.

In all 24 colleges from all over the country participated in eleven events. It is proud to say that the students of this college won five Winners and two Runners up Trophies. The winning team included Parikshit Matkari, Saurabh Dadarkar, Pritam Naik, Tanaya Acharekar, Janhavi Karopady from the BHMCT course and Sarvesh Jadhav from the BSc-HS course.


## Congratulations :



The AISSMS College of Hotel Management and Catering Technology is rejoicing at the 'sweep through' at the University of Pune ranks. There are two courses that the College runs BHMCT and BSc (HS). The college has bagged four out of the first five ranks of the BHMCT Course and two in the BSc (HS) Course.

Ms. Tanaya Acharekar stood 1st securing 86.15%, with Ms. Ketaki Dake standing 2nd with 80.14%. Ms. Nisha Sharma and Mr. Graydon Rodricks secured 78.25% & 77.75%to be placed in the 4th & 5th positions respectively. In the B.Sc. (Hospitality Studies) merit list, two of its students, Mr. Nikhil Kulkarni securing 83.17% and Ms. Shivani Kapoor scoring 78.50% respectively, bagging 2nd & 4th ranks respectively.

## AICP National Conference Agasti College, Akole :




Assocation of Indian College Principals (AICP) and Agasti Arts, Commerce and Dadasaheb Rupawate Science College, Akole organized a National Conference on 'Dynamics of Higher Education' on 19th and 20th May, 2009. Eminent Experts shared their views on the following topics :

1) Legal aspects in the Administration of colleges
2) Autonomy for colleges
3) Expansion of Higher Education
4) Relation with stakeholders

Principals from various states of the country participated in this National Conference. Former V.C. of University of Pune Dr. Ashok Kolaskar, Director of NAAC Dr. H. A. Ranganath were the prominent speakers on this occasion. The Chairman of Rayat Shikshan Sanatha

Hon'ble Raosaheb Shinde spoke about morality in educational field in his inaugural address.Hon'ble V.C. Dr. Narendra Jadhav was the Chief Guest for valedictory function. All AICP office bearers and Prin. Rameshchandra Khandage took sincere efforts in organization the conference at Bhandradara.

## Indira College Samarpan Group : Youth for Change



SAMARPAN is a group formed by Youths of Indira which include Students & Faculty members of Indira College of Commerce & Science (I.C.C.S.). It has been conducting many short term as well as long term activities. Their activities are as follows :

1. **Birthday celebration of children at Avishri Balsadan on 1st May :** Orphan children don't need money. They just need some love and care. That's what we try to give them on this occasion by celebrating their collective birthday. This is the day when we make them forget all their sorrows and make them enjoy their life by playing with them and making them smile. We have been doing so since 2008 and we hope to continue this till SAMARPAN exists.
2. **Food donation to pilgrims at Saint Tukaram Palkhi in Akurdi :** The Saint Tukaram Palkhi which goes from Dehu to Pandharpur every year halts at Vitthal Temple in Akurdi in the month of June. Lakhs of pilgrims come there to worship the Palkhi. On this occasion SAMARPAN donated food to the pilgrims who get tired travelling long distance with the Palkhi.
3. **Computer Literacy at PCMC School in Chinchwad :** In this PCMC School there were Computers but there were no Teachers to teach Computer to the student. By the contact of one of our members, SAMARPAN took the initiative to teach computer to the students of this school from 10th July, 2008.
4. **Ground work on the platforms of Pune Railway Station :** During this activity SAMARPAN surveyed the platforms of Pune Railway Station and saw the problems of the children staying on the platforms very closely. The students donated clothes to the poor people staying there. They also visited an NGO named 'SATHI' situated nearby which helps the children lost on the platforms to reach their homes.
5. **Book Donation Camp in Indira College :** The students of Samarpan collected books not required by the students of Indira College of Commerce and Science, segregated them in various categories and distributed them to the poor and needy children who don't have money to buy books. This activity was organized between 5th to 9th August, 2008.
6. **Visit to a Blind School in Talegaon and donation of Uniforms to the children :** SAMARPAN group frequently visits a Blind School situated in Talegaon and spend some quality time with the Blind Children to give them joy and make them smile.
7. **Blood Donation for the Victims of Mumbai 26/11 :** On 27th November, 2008 i.e. a day after the Terror Attack in Mumbai on 26th November, 2008, SMARPAN members donated blood for the victims at a Blood Donation Camp organized in the University of Pune.
8. **Voter Registration in Indira :** In association with Tata Tea's Jaago Re Campaign, we conducted a Voter Registration Drive in Indira College of Commerce and Science to register people who had not registered for voting in elections and to make people aware of their 'Right to Vote'. We registered around 1200 people under this campaign. It was organized between 28th to 30th January, 2009.

## समर्थ भारत अभियान :




पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व संगमनेर येथील ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने समर्थ भारत अभियान अंतर्गत 'कायदा व सुव्यवस्थेतील पोलिसांची भूमिका' या विषयावर एक–दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि. ८ ऑगस्ट, २००९ रोजी करण्यात आले होते. संगमनेरचे पोलीस निरीक्षक मा. व्ही. जी. तांबे यांनी कार्यशाळेचे उद्‌घाटन केले. या वेळी शिक्षण प्रसारक संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री. नारायण कलंत्री हे उपस्थित होते. खालील नामवंत वक्त्यांच्या सहभागामुळे कार्यशाळा अत्यंत यशस्वी झाली :

| | | |
|---|---|---|
| श्री. एस. टी. अग्रवाल (न्यायाधीश, संगमनेर) | : | पोलिस तपास प्रक्रिया (पंचनामा,FIR, इ.) त्रुटी व उपाय. |
| अॅड. नितीन जोर्वेकर (ज्येष्ठ विधिज्ञ) | : | मुंबई पोलिस कायदा व त्यातील सुधारणा. |
| डॉ. शर्मा व प्रा. संतोष देशमुख | : | पोलिसांचे आरोग्य. |
| श्री. संदीप वाकचौरे (पत्रकार) | : | नागरिकांच्या पोलिसांकडून अपेक्षा |
| डॉ. डी. एम. गुजराथी (प्राध्यापक) | : | ताण–तणावांतून मुक्तता. |

संगमनेर तालुक्यातील १०० पोलिस व विधी महाविद्यालयातील ५० विद्यार्थी या कार्यशाळेस उपस्थित होते. प्राचार्य हर्षवर्धन देवचके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. राजेश वानखेडे, प्रा. सुहास पत्की, प्रा. अपेक्षा अग्रवाल व विद्यार्थी–प्रतिनिधींनी कार्यशाळेचे उत्कृष्ट आयोजन केले होते. संगमनेर बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. जे. के. पवार, शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी अनिल राठी, खजिनदार बिहारीलाल डंग तसेच डॉ. अरविंद रसाळ यानी कार्यशाळेस सहकार्य केले. समारोपप्रसंगी शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजयजी मालपाणी यांनी अध्यक्षीय भाषण केले व सर्व सहभागी पोलिसांना विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

## संगमनेर महाविद्यालयातील 'कमवा व शिका' : ४८ वर्षांची तेजस्वी परंपरा




संगमनेर महाविद्यालय आणि 'कमवा व शिका' या योजनेचा गेले ४८ वर्षांपासून दृढ असा संबंध आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात ही योजना अस्तित्वात आहे. यामुळे महाविद्यालयातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना वर्षभराचा शैक्षणिक खर्च 'स्व'कष्टावर करता येऊ लागला. या महाविद्यालयाचा ५० एकरांचा मोठा परिसर आहे. पुणे विद्यापीठाच्या मदतीने 'कमवा व शिका' योजनेमार्फत महाविद्यालयाने अनेक उपक्रम राबविले. महाविद्यालयीन कार्यालयीन कामे व महाविद्यालय परिसराची स्वच्छता ठेवणे, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याला वाव मिळावा म्हणून सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यासाठी 'गांडूळखत' निर्मितीचा मोठा प्रकल्प महाविद्यालयाने सुरू केला. या महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून एक सुजाण समाजभिमुख व ज्ञानसंपन्न विद्यार्थी घडविणे हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून 'मागेल त्याला काम' या धर्तीवर दोनशे विद्यार्थी व विद्यार्थिनींना कामे उपलब्ध करून दिली आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेल्या या योजनेची ध्येये, उद्दिष्टांची परिपूर्तता करण्याचे काम सातत्याने महाविद्यालयाने केले. पुणे विद्यापीठाने रुपये दीड लाख एवढी रक्कम महाविद्यालयास दिली. या अनुदानाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना वर्षभर काम मिळावे याकरिता संस्थेनेसुद्धा विशेष आर्थिक साहाय्य केलेले आहे.

## INTERACTION 2009 : Inter-Collegiate Competitions at Modern College, Ganeshkhind, Pune

Computer Science Department of Modern College, Ganeshkhind organized an inter-collegiate competition for students of computer science. It consisted of four events viz., Online Programming, Quiz, Seminars and Projects. All events were separately conducted for UG & PG. The scholars and intellectual industrial experts from various software companies were invited as Judges for the above competitions. College is conducting this activity since the year 2003, but this year the response was overwhelming and 233 students from 30 affiliated colleges took part in these events.

The results of the events are as follows :

| Event | Winner (UG level) | Winner (PG level) |
|---|---|---|
| **Online Programming** | 1) Bhavesh Thakar (Wadia College)<br>2) Gaurav Das (Modern College, Shivajinagar)<br>3) Daapesh Shadija (BMCC)<br>4) Manasi Sakhare (Wadia College) | 1) Bhushan Karmarkar (P.V.G. College)<br>2) Deepmala Uttekar (Wadia College)<br>3) Vishal Gaikwad (Modern College, Shivajinagar) |
| **Quiz** | 1) Modern College, Ganeshkhind<br>2) Wadia College<br>3) K. G. M. College | 1) C.S.I.T. College<br>2) H. V. Desai College<br>3) M. I. T. College |
| **Seminar** | 1) Samarth Bari (Jedhe College)<br>2) Aarti Joshi (Modern College, Shivajinagar)<br>3) Kushal Thakurdas (Kashibai Navale Com. College) | 1) Prakesh & Prabhal Kumar (Bharati Vidyapeeth)<br>2) Niranjan Nimhan (Modern College, Shivajinagar)<br>3) Shweta Nandode (C.S.I.T.) |
| **Project** | 1) Sohan Mehta, Sachin Rawel, Aniket Palrecha (H. V. Desai College)<br>2) Nikhil Kulkarni (Modern College, Ganeshkhind)<br>3) Akash Deshitty (Wadia College) | 1) Prema Chavan, Vinay Das (Wadia College)<br>2) Chaitanya Kulkarni (Garware College)<br>3) Pradeep Bhosale, Sumit Gaikwad, Keval Chikane, Ketan Dhole (Modern College, Shivajinagar) |

Prashant Sinalkar, Smita Bomale, Pallavi Bulakh, Minal Jabde, Sonal Kulkarni, Suvarna Mhasekar, Rajender Bele and Satish Ambike worked as event manager during these competitions.

Prizes were distributed to the winners by the Chief Guest Dr. Gajanan Ekbote and the function was presided by Prin. (Dr.) Sanjay Kharat. Prof. S. V. Todkar, Prof. Varsha Joshi were also present on this occasion.

### विद्यार्थी कल्याण मंडळ प्रस्तावांबाबत :

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध योजना संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांच्या माध्यमांतून राबविण्यात येतात. याकरिता विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अर्थसहाय्य केले जाते. या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी योजना राबविणे आवश्यक असून त्याकरिता दि. १५ सप्टेंबर, २००९ पर्यंत विद्यार्थी कल्याण मंडळाकडे प्रस्ताव पाठवावेत. विहित नमुन्यातील प्रस्तावांचे मसुदे विद्यार्थी कल्याण मंडळाच्या 'विविध योजना : मार्गदर्शिका' या पुस्तिकेत तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

### नियतकालिक प्रकाशन :

वार्षिक नियतकालिक सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी प्रकाशित करणे आवश्यक आहे. त्याद्वारे महाविद्यालयाची संपूर्ण माहिती विद्यार्थी, पालक तसेच महाविद्यालयास वेळोवेळी भेट देणाऱ्या पाहुण्यांना मिळू शकते. महाविद्यालयातील उपलब्ध सोई सुविधा, शिकविले जाणारे अभ्यासक्रम, गुणवंत शिक्षक, विद्यार्थी खेळाडू यांबरोबरच विविध परीक्षांमध्ये विशेष नैपुण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती त्यामध्ये समाविष्ट असते. विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे दरवर्षी नियतकालिक स्पर्धेचे आयोजन करण्यात येते व प्रथम क्रमांकाच्या नियतकालिकास रु.१०,०००/-चे रोख पारितोषिकही देण्यात येते. या स्पर्धेतून जिल्हास्तरावरही पारितोषिके प्रदान करण्यात येतात. नियतकालिकासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी लवकरच एका कार्यशाळेचे आयोजन पुणे विद्यापीठात करण्यात येणार असून या कार्यशाळेसाठी महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक व संपादक मंडळाच्या प्रतिनिधीस निमंत्रित करण्यात येईल.

### प्रो-रेटा वेळेत पाठवा :

विद्यार्थ्यांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी व स्पर्धा आयोजनासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ व विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडे 'प्रो-रेटा'ची रक्कम महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी वेळेत पाठविणे आवश्यक आहे. विद्यार्थी कल्याण मंडळास प्रतिविद्यार्थी रु.३२/- प्रमाणे तर क्रीडा विभागास प्रतिविद्यार्थी रु.४४/- प्रमाणे 'प्रो-रेटा' पाठवावा. याबाबतचे तपशीलवार परिपत्रक सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना यापूर्वीच पाठविण्यात आले असून मा. कुलगुरू यांनीही सर्व प्राचार्य/संचालक यांना प्रो-रेटा पाठविण्याबाबत नुकतेच (संदर्भ पत्र क्र.एव्हीसी/४४४, दि.१३.०८.२००९ नुसार) आवाहन केले आहे.

एव्हरेस्ट शिखर सर केल्याबद्दल कु. कृष्णा पाटील हिचा पुणे विद्यापीठाच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगीचे छायाचित्र



**Chetana** is the Students' Bulletin of Board of Students' Welfare.
We welcome your responses at the following address :

**Board of Students' Welfare**
D.V. Potdar Sankul, University of Pune, Ganeshkhind, Pune - 411 007.
Tel.: 020 2560 1154 / 2560 1153, Fax : 020 2569 7341
E-mail : bsw@unipune.ernet.in, bswunipune@gmail.com

AKRUTI - 020-24224330